# १५ व्या वित्त आयोग व राष्ट्रीय आरोग्य अभियान
# खालील पदाकरीता अर्ज केलेल्या उमेदवाराकरीता जाहिर सुचना

१५ व्या वित्त आयोग व राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत विविध पदांच्या पदभरती करीता दि.१३/०६/२०२२ ते २४/०६/२०२२ पर्यंत अर्ज मागविण्यात आलेले होते. त्या अनुषंगाने खालील पदासाठी प्राप्त झालेल्या अर्जाच्या आधारे प्रारुप पात्र व अपात्र यादया आक्षेपकरीता प्रसिध्द करण्यात आलेल्या होत्या. त्यानंतर प्राप्त झालेल्या आक्षेपानुसार व अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांच्या छायाकिंत प्रतीच्या आधारे विविध पदाची सर्वसाधारण गुणवत्ता यादी व अंतिम अपात्र यादी प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर यादी ही मुळ कागदपत्रांच्या पडताळणीच्या अधिन राहून करण्यात आलेली आहे.

| अ.क्र | पदाचे नाव |
|---|---|
| १ | Medical Officer (MBBS) |
| २ | Staff Nurse |
| ३ | MPW |
| ४ | Block Facilator (Female) |

**वरील नमूद पदांची सदर सर्वसाधारण गुणवत्ता यादी ही फक्त उमेदवारांची शैक्षणिक गुणवत्ता, उच्च शिक्षण व शासकिय अनुभवाच्या गुणाकांवर करण्यात आलेली आहे.याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

याव्दारे उमेदवारांना सुचित करण्यात येते की, त्यांनी सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मुळ प्रति कागदपत्र पडताळणीच्या वेळेला सादर कराव्यात. तसेच अनुभव प्रमाणपत्र सक्षम अधिकारी (जिल्हा आरोग्य अधिकारी/जिल्हा शल्य चिकित्सक/आरोग्य अधिकारी मनपा इत्यादी) यांच्या स्वाक्षरीचे कागदपत्र पडताळणीच्या वेळेस उपलब्ध करुन देण्यात यावे. अन्यथा आपण सादर केलेल्या अनुभव प्रमाणपत्राच्या छायाकिंत प्रतीच्या आधारे अनुभवासाठी देण्यात आलेले गुण गृहित धरण्यात येणार नाहीत व देण्यात आलेले गुण कमी करण्यात येतील याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी. आरोग्य सेवक (एमपीडब्ल्यु) यांचेसाठी आवश्यक सॅनिटरी इन्सपेक्टर हया प्रमाणपत्राची शहानीशा झाले खेरीज अंतिम निर्णय घेतला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

उपरोक्त नमुद पदासाठी कोणीही खाजगी व्यक्ती, मध्यस्थ यांच्या अमिषाला बळी पडु नये.

**कागदपत्र पडताळणी व समुपदेशनाचा दिनांक, वेळ व स्थळ जिल्हा परिषद, लातूरच्या वेबसाईटवर (zplatur.gov.in) प्रसिध्द करण्यात येईल. कागदपत्र पडताळणी व समुपदेशन दिनांक उमेदवारांना स्वतंत्रपणे कळविण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.**

**सोबतः-** १५ व्या वित्त आयोग व राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत विविध पदांची पात्र उमेदवाराची सर्वसाधारण गुणवत्ता यादी व अपात्र उमेदवारांची यादी.

(डॉ. वडगावे एच.व्ही.)
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, लातूर.